ISSN – 2277-7911
Impact Factor – 5.519

YOUNG RESEARCHER
A Multidisciplinary Peer-Reviewed Refereed Research Journal

Jan-Feb-Mar 2024
Vol. 13 No. 1

# मराठवाडी ग्रामीण कवितेतील बोली भाषांतर आणि जीवनदर्शन

**श्री.रामदास माधवराज भालेराव[1], डॉ.प्रतिभा शंकर घाग-सोनी[2]**

*[1]पीएचडी रिसर्च स्कॉलर, मराठी विभाग, श्री जेजेटी युनिव्हर्सिटी, राजस्थान, भारत*

*[2]प्राध्यापक आणि संशोधन मार्गदर्शक, श्री जेजेटी युनिव्हर्सिटी राजस्थान, भारत*

*Corresponding Author: श्री.रामदास माधवराज भालेराव*

**DOI - 10.5281/zenodo.10656226**

ग्रामीण कविता, मराठी साहित्यातील अनेक विविध प्रकारांपैकी एक प्रमुख वाङ्मयप्रकार म्हणून उभा राहिली आहे. "मराठवाडी ग्रामीण कवितेतील बोलीभाषांतर आणि जीवनदर्शन" हा विषय एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि सूचनात्मक विचारात्मक परिचय प्रदान करण्यात आला आहे. ग्रामीण कविता, मराठी साहित्याच्या अद्वितीय आणि संवेदनशील भागातून एक विशेष गोष्टीला धरून आलेली आहे. या कवितांमागील लेखकांनी ग्रामीण भाषेतील सामाजिक, सांस्कृतिक, आणि आर्थिक वायसायिक परिस्थित्यांचे छायाचित्र केले आहे. गावांच्या जीवनातील सौंदर्य, संघटना, आणि ग्रामीण भूतपूर्वक जीवनशैली हे सर्वांत महत्त्वाचे आशय आहे, असे कवितांतर्गत अभिव्यक्त केले जाते. ग्रामीण कवितेतील बोलीभाषांतर म्हणजेच ती कविता ज्यात गावाची भाषा आणि लोककला साकारात्मकता स्थानांतर केली आहे. या कवितांतर्गत गावांचे असलेले स्थानीक विशेषत्व, विविधता, आणि साने-गुरुजींच्या मार्गदर्शनाने निर्माण केलेले बोलीसंवेदनशील छायाचित्र वाचकांना अनुपम आनंदाची अनुभूती करू शकते. या कवितेत जीवनदर्शनाचे विस्तार होते. ग्रामीण जीवनातील सर्व रंग, भावनांची उरळ, आणि संघटना अद्याप रंगांकिंब आनंदित करताना वाचकांना स्पष्ट होते. ग्रामीण कवितेचे हे विशेष आणि सांगीतिक प्रयोग वाचकांना भावनांची गंभीरता वापरते आणि ग्रामीण सांस्कृतिक धरोहरांची उपास्यता सुरक्षित करते. मराठवाडी ग्रामीण कवितेतील बोलीभाषांतर आणि जीवनदर्शन हे एक समृद्धीचे, सांविदानिक, आणि साहित्यिक अनुभवांचे संगम आहे. ह्या कवितांमागील सर्जकांनी गावाच्या वातावरणातील सर्व रंग, सौंदर्य, आणि भावना संगीतित केले आहे, ज्याने वाचकांना गावाची अद्वितीयता अनुभवायला सांगेल.

शिक्षणाच्या झालेल्या प्रसारामुळे खेड्यातील अनेक शिक्षितांनी आपली अनुभवसृष्टी ग्रामीण शब्दरूपात मांडण्याचा प्रयत्न केला आणि त्यातूनच ही मराठी ग्रामीण कविता उदयास आलेली आहे. ग्रामीण मराठी कविता म्हणून प्रथम मानकरी ठरलेल्या महात्मा फुले, केशवसुत यांच्या कवितांपासून सुरू झालेली ग्रामीण मराठी कवितेची वाटचाल स्वातंत्र्योत्तर कालखंडात वास्तव ग्रामीण जीवनानुभवातून अस्सल, कसदार ग्रामीण कविता जन्मास आली आहे. या ग्रामीण कवितेचा प्रवाह आज आपणास वैभवी वाटचाल करताना दिसतो. या कवितेत ग्रामीणतेच्या तळागाळापर्यंत पोहोचणारी सखोलता आणि सूक्ष्मता आहे. ही कविता खेड्यांचे बदलते स्वरूप, तेथील जनजीवन, निसर्गसौंदर्य यांचा अचूक वेध घेते. स्वानुभवातून प्रकट होणाऱ्या आणि ग्रामीण मनाचा हुंकार असणाऱ्या मराठी ग्रामीण कवितेस मराठी साहित्याच्या इतिहासात निश्चितच मानाचे स्थान आहे. प्रस्तुत

प्रकरणातून मराठी ग्रामीण कवितेची वाटचाल संक्षिप्तपणे मांडून ना. धों. महानोरांच्या काव्य प्रवासातील टप्पे मांडले आहेत. भाषा ही समाजनिर्मित आणि समाजजीवनाला अगदी आवश्यक अशी संस्था आहे. भाषेशिवाय समाजजीवन संभवू शकत नाही. समाजातील एका व्यक्तीचे दुसऱ्या व्यक्तीशी जे व्यवहार चालतात त्यांचा आधार भाषा हाच असतो. म्हणूनच भाषा ही सामाजिक व्यवहारातील एक मूलभूत गरज आहे. काही व्यवहार असे असतात की जे समाजातील एका समूहापुरते मर्यादित असतात अशा समूहातील भाषेचे स्वरुप सामान्य समाजाच्या भाषेपेक्षा जिला डॉ.ना गो. कालेलकर 'लौकिक भाषा' म्हणतात त्यापेक्षा भिन्न असते. एका व्यवसायातील एकाच धर्माची किंवा एकच सांस्कृतिक परंपरा असणाऱ्या व्यक्तींना एकत्र आणणारी आणि सामान्य भाषेपेक्षा वेगळी अशी बोली असते. पारंपारिक जीवन लोकसमूह बोली बोलतात आणि ती अगदी भिन्न भाषिक पर्यावरणात कायम ठेवतात.

**ग्रामीण कवितेची अद्वितीयता बोलीभाषा:**

एका भाषिक प्रदेशातील बोलीभाषा स्थलानुसार बदलत असली तरी लिखित भाषा मात्र बव्हंशी एकच प्रमाणभाषा असते. कवितेची भाषा लिखित गद्य भाषेपेक्षा वेगळी राहिलेली आहे. तिला केवळ सांगायचे नसते. ते सांगणे प्रतीतही करायचे असते. त्यासाठी ती प्रमाणभाषेकडून बोलीभाषेकडे वळत असते. काव्य संस्कृताधिष्ठित असताना केशवसुतांची कविता साध्या मराठीतून आली. त्यासाठी त्यांना त्या काळी शब्ददरिद्रीही म्हणवून घ्यावे लागले. त्यांचा नवा शिपाई

**जिकडे जावे तिकडे माझी भावंडे आहेत**
**सर्वत्र खुणा माझ्या मजला घरच्या दिसताहेत**
**असे साध्यासुध्या मराठीतून सांगतो. पण या खुणा पटवताना तो म्हणतो,**
**कोठेही जा पायाखाली तृणावृता भू दिसते**
**कोठेही जा डोईवरती दिसते नीलांबर ते**

आपल्याला जे जाणवते आहे ते मात्र साधेसुधे नाही. त्याचे असामान्यत्व दाखविण्यासाठीच की काय, केशवसुतांना 'तृणावृता भू' 'नीलांबर' असे संस्कृत शब्द वापरावेसे वाटले असावेत.

पुढे बोलीभाषेतूनही मराठी कविता येऊ लागल्या. रविकिरण मंडळातल्या किरणांनी ग्रामीण भाषेत कविता लिहिल्या, पण त्यांतली मानसिकता नागर वाटत राहिली. आता गावाकडच्या निवेदकाच्या भावभावना आणि प्रगल्भ जाणिवा व्यक्त करण्यासाठी ग्रामीण भाषा समर्थ आणि समर्पक असल्याची प्रचीती अनेक कवींनी आणून दिली आहे. ग्रामीण भाषेत लिहिलेल्या बऱ्याच कविता, अभंग, ओवी, लोकगीतांच्या छंदातून आल्या. आजही येत आहेत. पण कवितेतली गावकडची - शेतकऱ्याची भाषा कालानुसार हैब्रीड झाली आहे.

**हैब्रीड**
**वाणीकिणीचा पाऊस**
**असा आला तसा गेला**
**शिवाराचा बांधेसूद**

**देह निम्माअर्धा ओला.**
**सोन्याहून महागले**
**हैब्रीडाचे बी बियाणे**
**गेले साल घटावले**
**गावरान पेरल्याने.**
**अशा निर्वाणीच्या वेळी**
**जरी हैब्रीड पेरले**
**पुढे पावसाचे कोणी**
**शब्दचित्र रेखाटले?**
**आज तरी पावसाचा**
**नाही मागमूस कोठे**
**हैब्रीडाच्या बियाण्याला**
**गावरान रडू फुटे.**

शशिकांत शिंदे यांच्या या कवितेत 'वाणीकिणी'सारख्या गावरान शब्दाबरोबर 'हैब्रीड'सारखा हैब्रीड शब्द सहज आणि सार्थ होऊन येतो. पण अनेक छंदोबद्ध ग्रामीण कवितांची भाषा आणि भाव तसाच रोमँटिक राहिलेला आहे. शंकर सखारामांच्या कवितेत भेटणारी 'एकटी पोर' एकटी नाही. अनेक कवींच्या अनेक कवितांतून तसाच 'झिनझिनाट' उठवणार्याभ पोरी भेटतात.

देशावरच्या ग्रामीण भाषेव्यतिरिक्त मराठीच्या इतरही बोलीभाषांतून कविता अवतरल्या आहेत. विठ्ठल वाघ वर्‍हाडी बोलीत लिहितात. महेश केळुसकरांचा झिनझिनाट मालवणीतून प्रत्ययाला येतो. वाहरू सोनवणे आदिवासी मुलाच्या सूक्ष्म जाणिवा अहिराणी भाषेतून व्यक्त करतात. पण मराठी वाचकांसाठी तिचा मराठी तर्जुमा द्यावा लागतो. निवेदकाची अस्सल भाषा म्हणून बंबैय्या हिंदीतून आपली मराठी कविता लिहायला आजचे कवी कचरत नाहीत आणि आपणही या कविता वाचायला! वर्जेश सोलंकींच्या 'शब्बाखैर' कवितेची निवेदिका बारबाला आहे. ही कविता संपूर्णपणे बंबैय्या हिंदीतून आहे. इंग्रजी ही आज ज्ञानभाषा आणि संपर्कभाषाही झालेली आहे. अनेक इंग्रजी शब्द मराठी कवितेत अगदी घरच्यासारखे वावरतात. सलील वाघांच्या 'चॅट'सारख्या कवितेत रोमन लिपीतून चॅट केलेले आहे. त्यांच्या 'भूर्जपत्र'सारख्या कवितेत संस्कृत, इंग्रजीबरोबर कानडीही येते, तेव्हा आपण हसण्याखेरीज काहीच करू शकत नाही!

***मात्रा कुण्डलिनी ज्ञेया ध्यानमस्य प्रवक्षते॥***
***(नारदस्मृती ५६ पं०ग०हे०-भा०लि०मौ०ए०)***
***चॅरिटेबल ट्रस्टच्या तोर्यायत फणकाऱ्याने***
***सांगायचे***
***झाल्यास; औदु निर्दिष्ट अक्षरवन्नु वैयक्तिक***
***अभिरुचिगे***
***तक्कन्ते अळवडिसिकोंडु***
***मूलत:बदलावणेगळन्नु***
***माडदे बरेयबहुदु बल्लेबल्ले***

नागर बोलीभाषाही कवींना वापरावीशी वाटते. तथाकथित काव्यात्म शब्दांऐवजी साधे बोलण्यातले शब्द असलेली बोलगाणी पाडगावकर लिहितात. आपण लिहिताना व्याकरणशुद्ध भाषा लिहितो. पण बोलताना ती उच्चारसुलभ करून बोलतो. अशा भाषेचा वापर नितिन कुलकर्णी

आपल्या कवितांतून खुबीने करतात. त्यांची ही 'केसाच्या अंतरावर' :

***केसाच्या अंतरावर कटिंगवाला***
***पावलाच्या अंतरावर चप्पलवाला***
***पिशवीच्या अंतरावर भाजीवाला***
***अंडीलोणीदूधगिर्णी अगदी लागुन लागुन***
***शाळाकॉलेजं ऑफिसंफिफिसं अगदी लागुन लागुन***
***पूर्व-घराचा प्रवेश, ईशान्य-देवघर***
***उत्तरेकडे उत्तमांग करून कधीच झोपत नाए***
***उघड्या दारातून उभी चूल कधीच दिसत नाए***
***दक्षिण भिंतीवरती एक छिद्रसुद्धा ठेवलेलं नाए***
***म्हणजे आता, सगळं कसं अगदी सेफैनाए?***

उच्चारानुसारी भाषेतून लिहिताना येथे नितिन कुलकर्णी आजच्या शहरवासियांची जीवनदृष्टीही व्यक्त करतात. उच्चारानुसारी भाषा ते इतकी ताणतात की आपल्याला हसू येते. पण आपण या भाषेला हसताना या जीवनदृष्टीलाही नकळत हसतो. या जीवनदृष्टीवर कोणतेही भाष्य न करता केवळ या भाषेच्या वापरातून कवी या जीवनदृष्टीची योग्यायोग्यता प्रश्नांकित करतो.

**बोलीभाषांचे महत्त्व:**

बोली या व्यक्तीच्या सांस्कृतिक आणि प्रादेशिक अस्मितेचा अविभाज्य भाग आहेत आणि त्या भाषिक विविधतेचे जतन आणि संवर्धन करण्यात मदत करतात . ते लोकांना त्यांचा अद्वितीय सांस्कृतिक वारसा आणि विशिष्ट समुदायाशी संबंधित असल्याची भावना व्यक्त करण्याचा एक मार्ग म्हणून देखील काम करतात.

**ग्रामीण कवितेतील बोलीभाषांतराचा महत्त्व:**

"ग्रामीण कवितेतील बोलीभाषांतर" हे विषय अत्यंत महत्त्वाचं आहे, कारण त्याचं महत्त्व किंवा लाभ विविध आचारधर्मांच्या बोलीभाषेतील शब्दांतराच्या अंशाने आहे. ग्रामीण क्षेत्रातील कवितांमध्ये बोलीभाषांतराची मुख्यता हे कारणे आहे:

**सांस्कृतिक अनुभव:**

ग्रामीण क्षेत्रातील कवितेतील बोलीभाषांतराने वाचकांना त्या समृद्धि सांस्कृतिक अनुभवे मिळवते. भाषेतील सांस्कृतिक धरोहर, भूमिका, आणि समृद्धिचंद्रिका वाचकांना स्वानुभूत करून घेतलेली जाते.

**भाषेचे साहित्यिक आणि भाषैक अंग:**

बोलीभाषांतराने ग्रामीण कवितेतील भाषा साहित्यिक दृष्टिकोनातून सुधारित होते. ती भाषा साहित्यिक उपक्रमांच्या संरचनेत सुधारित होते, ज्यामुळे साहित्यिक प्रतिसाद अधिक सुगम होतो.

**ग्रामीण जीवनातील भाषा आणि अभिव्यक्ती:**

ग्रामीण कवितेमध्ये असलेली बोलीभाषा ग्रामीण जीवनातील अभिव्यक्तीसाठी एक महत्त्वपूर्ण साधन आहे. ही भाषा ग्रामीण समुदायातील

भावनांना सजीव करते आणि एकात्मकता स्थापित करते.

**भाषेतील सार्थकता:**

ग्रामीण कवितेची बोलीभाषांतराने भाषेतील सार्थकता सुरू ठेवली जाते. ग्रामीण साहित्यिक आणि सांस्कृतिक आपत्तिंच्या संदर्भात शब्दांतराची महत्त्वपूर्ण भूमिका होते.

**सांस्कृतिक समृद्धिचंद्रिका:**

बोलीभाषांतराची प्रक्रिया ग्रामीण सांस्कृतिक समृद्धिचंद्रिकेत एक अभिन्न चंद्रिका म्हणून समाहित करते. त्यामुळे सांस्कृतिक समृद्धिचंद्रिकेची वाचकांना मिळवते.

**ग्रामीण कवितेतील जीवनदर्शन:**

कविता प्रारंभी जानपदाच्या प्रवाहाने मराठी साहित्यात पाझरलेली आहे. ग्रामीण माणसाच्या भावभावना, निसर्ग, वातावरण, जित्राब इत्यादी ग्रामीण बोलीतून जानपद काव्य अवतरलेले आहे. जानपद कवितेत भा. रा. तांबे, यशवंत, गिरीश, चंद्रशेखर इत्यादींनी यांनी हेतुपूर्वक जानपद कविता लिहिलेली आपल्याला दिसून येते. श्री. बा. रानडे, अनंत काणेकर, ना.घ. देशपांडे, वा.गो. मायदेव. वि.भि. कोलते, भ. श्री. पंडीत ग.ह पाटील, ग. ल. ठोकळ, सोपानदेव चौधरी, के. नारखेडे, पा. श्रा. गोरे आदि लिहित्या वाचत्या लोकांनी ग्रामीण कविता आपापल्या भाषेत वाचकांना दिली. अक्षरशत्रू असलेल्या बहिणाबाईनी देखील मराठी वाचकांना कवितेतून ग्रामीण जीवनाचा अनमोल ठेवा दिलेला आहे. मराठी ग्रामीण कवितेत आपापल्या प्रादेशिक बोलीतून, प्रादेशिक कविनी ग्रामीण कविता आहे, परंतु व्यापकता लक्षात घेता या ठिकाणी मराठवाड्यातील काही मराठी ग्रामीण कविच्या कवितेचा विचार या ठिकाणी करण्यात आलेला आहे.

त्यात ना.धो. महानोर, इंद्रजित भालेराव, भारत हंडीबाग, केशव देशमुख, माधव जाधव, ललित अधाने, चंद्रशेखर मलकमपट्टे आदि कविच्या कवितेचा विचार पुढील प्रमाणे करण्यात आलेला आहे.

ना.धो. महानोर हे मराठवाड्यातील ग्रामीण निसर्ग कवी आहेत. मराठवाड्यातील घ्पळसखेड या छोट्याशा ग्रामीण गावात जन्म झालेला आहे. शेतात राबत, कष्ट करत, फळबाग फुलवत कविता ना. धो. महानोर आहेत. त्यांचे घराणातल्या कविताड, घ्वहीड, घ्पावसाळी कविताड, घ्अजिंठाड, घ्पानझडड, घ्पळसखेडची गाणीड, घ्गाथा शिवरायांचीड, र्घतचीकहाणीड, घ्प्रार्थना दयाघनाड इत्यादी काव्यसंग्रह प्रकाशित आहेत. घ्हे खेडे अंधाराचेड ही त्यांचीच एक कविता आहे. त्या कवितेत ना.धो. महानोर म्हणतात

**'हे खेडे अंधाराचे**
**हे खेडे प्रकाशाचे**
**जन्मोजन्मी लक्तरलेले**
**दुःख घेऊन चालत आले' (पृ. 152)**

ग्रामीण जीवनातील वास्तवता ना. धो. महानोरांनी कवितेत मांडलेली आहे. महानोर एक

ग्राम जीवनाचा आस्वाद घेतलेले संवेदनशील कवी आहेत. रात्रंदिन बळीराजा कितीही कष्ट केला, तरी त्याच्या जीवनातील दुःखाच्या हालअपेष्टा काही कमी होत नाहीत. ग्रामीण जनजीवन पूर्णतः निसर्गावर अवलंबून आहे. त्यामुळे निसर्ग वेळेवर प्रसन्न झाला, तर कष्ट उपसणारे लोक आनंदात जीवन जगतात अन्यथा अंधारात खिदपत पडलेली अवस्था त्यांच्या वाट्याला येते. ग्रामीण जीवनाच्या दुःखाची परंपरा अचानक निर्माण झालेली नाही, तर बऱ्याच दिवसापासून चालत आलेला अविरत प्रवास आहे. त्याच वाटेने प्रत्येक माणूस चालण्याचा प्रयत्न करतो. नव्याने परिवर्तनाचा मार्ग शोधण्याचा प्रयत्न कोणीही करत नाही. कारण खेड्यातील लोकांची पारंपारिकतेवर अपार श्रध्दा असते. पारंपारिक दुःखाची श्रध्दा पुढच्या पिढीवर लादण्याचे काम प्रत्येक गावातील पिढी करते. कवि महानोर म्हणतात.

**'मर्तिकाच्या दुःखापरीस**
**पांघर घालून आयुष्याचीङ (पृ. 152 )**
**लखलख उन्हात न्हाऊन धुवून**
**बरसातीला गाते**
**हे खेडे मोरापरीस**
**मेघांसाठी भिरकत जाते.**
**ढेकळांच्या गर्तमधून**
**मृगामधले गाणे गाते' (पृ.152)**

अशिक्षित अडाणीपणामुळे ग्रामीण समाजाच्या राहण्याचा दर्जा सुधारलेल्या नाही. त्यांना तशा प्रकारचे ज्ञान प्राप्त झालेले नसते. माहितीचे, ज्ञानाचे संक्रमण करण्याचे साधन नसते. खेड्यातील लोकांना अनेक समस्या, अडचणी असतात, परंतु आपल्या मनातील दुःख दुस-याला सांगण्याची सवय त्यांना झालेली नसते. स्वतःच मनातल्या मनात जळत राहण्याची प्रवृत्ती असते. जीवंत असुनही मृतप्राय माणसासारखी अवस्था झालेली असते. चेहऱ्यावर आनंदाची झालर असते, पण अंतःकरणात दुःखाची पखरण असते, तसेच मरणमय निर्जीव चेतना जाणवते. घ्हे खडे अंधाराचेङ या कवितेत कविने अविकसित, शुष्क कोरड्या जीवनाची वाताहत मांडलेली आहे. खेड्यात आनंद सहजासहजी प्राप्त होत नाही, तर त्यासाठी उन्हाळयाच्या दाहकतेचे चटके सहन करावे लागते. आनंदाचे गाणे गाण्यासाठी उन्हाचा प्रखर मारा सहन करावा लागतो. मगच अविट अशा गोड साखरेची चव चाखता येते. मानवी जीवनात मुसळधार पावसाचा वर्षाव होण्यासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण करावी लागते. तेंव्हाच हिरवळीच्या झुळकेचा मनमुराद आस्वाद घेता येतो. ग्रामसंस्कृतीत घ्मोरङ उन्मेद हर्षाचा प्रतीक आहे. मोराच्या शरीरात जो उत्साह असतो तसाच आनंद पावसाच्या आगमनाने माणसाला होतो. खेड्यातील सामान्य जीवन पावसासाठी आतूर होते. पाऊस माणसाच्या जीवनाचा अविभाज्य घटक आहे. एक नवसंजिवनी देण्याचे देण्याचे काम मेघअमृत करते. पावसाच्या वर्षावाने गावकऱ्यांना मोराने फुलविलेल्या पिसाऱ्यासारखा आनंद होतो. प्रत्येक वस्तीचा पाया माती आहे. मातीमध्ये सोनं तयार

करण्याची क्षमता आहे. काळ्या आईच्या सेवेतून पोटाची खळगी भरते. म्हणून प्रत्येक व्यक्ती संघर्ष करतो.

ग्रामीण जनजीवनाचे कवितेत अस्सल जीवनदर्शन घडविणारे ‘केशव सखाराम देशमुख’ आहेत. त्यांचे ‘धाढाड’ आणि ‘चालणारे अनवानी पायड’ हे दोन काव्यसंग्रह आहेत. त्यांच्या धाढाड नावाच्या पहिल्या काव्यसंग्रहातील पाढा कविता आहे. या कवितेत कवि केशव देशमुख म्हणतात.

**'शेतकरी बारमाही सोलून निघालेला**
**शिवाराची पावसाळी भाषा**
**समजून घेण्याइतकी प्रज्ञा**
**निसर्गानं त्याच्या धोतराच्या सोग्यात टाकलेली**
**म्हणूनच माती खालच्या बियांच**
**अंकुरण्याच गाण**
**गुणगुणत तो जगतो हिमतीनं**
**बाकी त्यांचे व्यवहारातले पाढे**
**वर्गात पस्तीस गुण मिळवणाऱ्या पोरासारखेच'**
**(पृ.158)**

शेतकरी केंव्हा समाधानी नसतो. त्याला तशी परिस्थिती बनवते. कोणत्यान कोणत्या व्यथेमध्ये तो जडलेला असतो. शेतकरी ज्या आशेवर जगतो, ती आशा म्हणजे शेती होय. निसर्गाचा पाऊस अनिश्चित स्वरुपाचा आहे. त्यामुळे पाऊस केंव्हा पडता, तर केंव्हा पडत नाही. शेतकरी निसर्गाकडून तसेच काव्यबाज सावकाराकडून नेहमीच भरडून निघता, म्हणून शेतकरी सतत जर्जर अवस्थेत जीवन जगतो. शेतकरी अडाणी जरी असला, तरी त्याच्या जाणतेपणा असतो. तो शेतीच्या बाबतीत प्रज्ञावंत असतो. कारण तो सतत शेतीच्या क्षेत्रात असल्यामुळे त्यातील बारकावे त्याच्या सहज लक्षात येतात. प्रत्येक शेतकरी बुध्दीमान, हुशार असतोच असे नाही. तो हुशार नसला, तरी सततच्या अनुभवातून वैचारिक बनत जातो. पीकात कोणते बदल करायला पाहिजे. शेतीतील पीकात कोणते बदल नैसर्गि पणे झालेले आहेत. त्या पीकासाठी कोणत्या व्यवस्थापनाची आवश्यकता आहे. अशा विविध दूरदृष्टीची जाणीव त्याला आलेली असते. शेतकरी पीकावर, स्वतः व आपल्या कुटुंबाचे संगोपण करतो. शेतीत बियाणांची पेरणी कशी केली पाहीजे, बियाणे उवगण्यासाठी आवश्यक ओलावा आहे का? कोणत्या वातावरणात, हंगामात पेरणी केली पाहिजे इत्यादी अनुभवातून शेतकऱ्याचा आत्मविश्वास वाढतो. पीकाच्या बळावरच सरासरीपेक्षा जास्त प्रमाणात उत्पादन काढून जगण्याची हिंमत करतो. ग्रामीण भागातील शेतकरी शेतीच्या बाबतीत हुशार आहेत. शेतीत मशागत किंवा लागवड करण्याबाबतीत स्वयंपूर्ण आहेत. अशिक्षित असणारा शेतकरी सुशिक्षित माणसापेक्षा शेतीत त्याची गगन भरारी आहे. आजचे युग स्पर्धेचे, तसेच माहिती तंत्रज्ञानाचे आहे. याची त्याला जाणीव नाही. तो प्रमाणिकपणे तसेच इमानइतबारे शेतीची कामे पार पाडतो. त्याला शेतीशिवाय इतर बाबींचे ज्ञान साधारण म्हणजेच जेमतेम आहे. व्यवहारिक ज्ञान जीवन जगण्यासाठी आवश्यक आहे. शेतकरी

व्यवहारिक जगतात कमी पडतो. शाळेच्या वर्गात साधारण बुध्दी असणाऱ्या विद्यार्थ्यांसारखी अवस्था शेतकऱ्यांची आहे. पुढे कवि म्हणतात-

**'शेतकरी बाजारात आला की**
**बाजाराच्या लुटीच्या डोळ्यात**
**मुरू लागले त्याला वागवण्याची रचना**
**अशा वेळी**
**आधीच सोलून निघालेल्या शेतकऱ्याची दुखरी कहाणी**
**त्यांच्या जिभेतून सांडतो भाषेचा विस्तार**
**शेतकऱ्यांच्या पावसाळी जखमा**
**जिभेतून सांडणाऱ्या भाषेचा विस्तवामुळं**
**नाहीशा येतात भरून' (पृ.159)**

बाजारपेठेत व्यापाऱ्यांचा गोड समज असतो की शेतकऱ्याला काही ही समजत नाही. बिचारा शेतकरी प्रामाणिक असतो. आडते व्यापारी शेतकऱ्याला सोलून काढण्यासाठी लक्ष देऊन असतात. कोणकोणत्या स्वभावाच, राहणीमानाचे लोक येतात. अशांची व्यापारी प्रतीक्षा करतात. शेतकऱ्याला कशा प्रकारे फसवता येईल, त्यातून आपली झोळी कशी भरवता येईल, त्याचेच चिंतन सुरू असते. शेतक-याला कशा प्रकारे उघड करता येईल, याच विचाराच्या बेतात व्यापारी असतात, परंतु त्याच्या कष्टाचा, घामाचा कोणीच सहानुभूतीपूर्वक विचार करत नाही. आडत्यांच्या समोर स्वतःची खळगी असते, परंतु रांत्रंदिवस शेतात रगत ओकणाऱ्या शेतकऱ्यांचा विचार मात्र नसतो. शेतकऱ्यांच सर्वत्र शोषण होते. कुठेही त्यांच्या राबतेपणाचा विचार होत नाही. शेतकऱ्यांच्या अशिक्षितेत प्रामाणिकपणा दडलेला आहे. त्यामुळे व्यवहारातील चतुर बगळे शेतकऱ्याला नागव करतात. काव्यबाजपणे आपला हामला यशस्वी करतात. त्यातच धन्यवाद व्यक्त करतात, म्हणून शेतकऱ्याला कुठेही धारा नाही. अर्थात शेतकरी सर्वत्र निराधार झालेला आहे त्यामुळेच त्याच्या हाती फासेचा दोर येत आहे. गळ्याचा फास म्हणजे जीवन नाही. तर येणाऱ्या समस्यांवर मात करून पुढे जाणे म्हणजे जीवन आहे. सध्या असे चित्र शेतकऱ्यांचे दिसत नाही. आजचा बळीराजा निसर्ग, पाऊस, वातावरण, कर्जबाजारीपणा, नापीकपणा इत्यादी घटकांना वैतागून जीवन संपवण्यात समाधान मानत आहे. याचा मुळात जाऊन विचार करणे अगत्याचे आहे. कवि कवितेत शेतकऱ्यांचे मनोगत व्यक्त करतो. शेतकऱ्याला दैनंदिन जीवनातील खाचखळगे माहित नसतात, त्यामुळे वाट्याला येणारा त्रास निमुटपणे सहन करतो. त्याच्या समोर दुःख सहन करण्याशिवाय पर्याय नसतो. अन्याय अत्याचारा विरोधात प्रतिकार करण्यासाठी त्याचे धाडस होत नाही. अगोदरच शेतकरी अनिश्चित पावसामुळे जर्जर झालेला असतो. तो शिव्याशाप देण्याशिवाय दुसरे काहीही करु शकत नाही. मनातील आग, दुःख, वेदना बोली भाषेतून झनझनीत व्यक्त करतो. ग्रामीण बोली म्हणजे भाषेचा खरा आत्मा आहे. त्यातून अर्थाचे वेगवेगळे वलये निर्माण होतात.

जगण्याची सुसंगती आणि विसंगती ग्रामीण प्रतिमेतून व्यक्त करणारे कवी घ्माधव जाधवड आहेत. घ्कयाधू काठङ या प्रातिनिधिक काव्यसंग्रहाचे संपादन कवीने केलेले आहे. घ्कयाधू काठङ या काव्यसंग्रहातील ध्बोलभांड तात्याचे पाणी आडवा धोरणङ ही कविता आहे. ग्रामीण प्रतिमेचा अस्सल नमुना म्हणजे घ्बोलभांड तात्याचे पाणी आडवा धोरणङ ही कविता आहे. कवि घ्माधव जाधवड यांचा जन्म ग्रामीण भागात झालेला असल्यामुळे त्यांची निरीक्षण शक्ती सूक्ष्म आहे. लोकांच्या वागण्यातील व बोलण्यातील विसंगती दैनंदिन बोलीतून कवितेत व्यक्त झालेली आहे. घ्यामीण प्रतिमाङ सर्वच लोकांच्या परिचयाच्या आहेत. या प्रस्तूत कवितेत प्रतिमा जीवंतपणे हुबेहुब झालेल्या आहेत. तसेच मानवी वर्तनातील विसंगती ग्रामीण प्रतिमांच्या आधारे कवितेतून व्यक्त झालेली आहे. कोणत्याही कवितेत प्रतिमा कायम असतात. काव्याच्या आशयात अभिव्यकती रचना प्रकारात कोणतेही बदल झाले, तरी प्रतिमा मात्र कायमच राहतात, म्हणून कवितेचा खरा गाभा म्हणजे प्रतिमा आहे. कवि माधव जाधव प्रतिमारुपी कवितेत म्हणतात इ.

मराठवाड्यात अलीकडे नव्याने ग्रामीण कविता लिहिणारे नव्या पिढीतील कवि घ्ललित आधानेङ आहेत. त्यांचे पूर्णनाव घ्लक्ष्मण दगडू आधानेड आहे. घ्ललित आधानेड या टोपण नावाने काव्यलेखन केलेले आहे. त्यांच्या नावावर घ्कुणबी बापड हा काव्यसंग्रह प्रकाशित आहे. घ्कुणबी बापड या काव्यसंग्रहातून घ्शेतात पसरला गाळङ ही कविता घेतलेली आहे. घ्ललित आघानेड नव्या पिढीतील ग्रामीण सशक्त कवि आहेत. निसर्गात वेगवेगळ्या आपत्ती घडतात. त्या संकटाचे परिणाम निष्पाप लोकांना निमुटपणे सहन करावे लागते. नैसर्गिक आपत्तीपूढे कुणाचेही निभाव लागत नाही. घ्शेतात पसरला गाळङ या कवितेत कविने अचानक निर्माण झालेले संकट म्हणजेच पूर किती भयानक असते. यातून अस्मानी सुलतानी संकट कसे निर्माण होते. ग्रामीण जीवनाच्या दुःखद वाताहतीचे दर्शन कवितेत घडविले आहे. कवि आधाने कवितेत म्हणतात-

**'शेतात पसरला गाळ वाळूत पसले**
**दुःख डोळ्यातून गंगा वाहे भेसूर होता**
**पूर संसार वाहुनी जाता बडवून घेतलेलं**
**ऊर गोठ्यात गायीच्या वेणा वासरु वाहे**
**धारेत आकसून गेला नाळ' (पृ.161)**

कवितेत अचानकणे अस्मानी संकट निर्माण झालेले आहे. शेती पूर्णपणे उद्ध्वस्त झालेली आहे. बांधबंधारे नाल्यांची नासधूस इ गलेली आहे. महाप्रलयकारी पूर म्हणजे प्रचंड मोठा रुद्रावतार आहे. पुराच्या अवतारापुढे सर्वच शक्त्या फिक्या पडतात. शेतातील पिक नाहीसी झालेले आहेत. पुराची परिस्थिती पाहून तहान भूक सर्वांचीच हरवते. पुरामुळे शेती संपूर्णपणे वाळूमय झालेली आहे. त्याचे वाळुत शेतकऱ्यांचा उदरनिर्वाह सामावलेला आहे. ग्रामीण जीवनाच्या वाताहतीचे दर्शन कवितेत पहावयास मिळते. पुराची आहाकार परिस्थिती

पाहताच कुणाच्याही डोळ्यातून अश्रूधारा वाहू लागतात. कवितेत ग्रामीणत्वाच्या संसाराची पूर्णपणे उध्दस्तता झालेली आहे. चांगला संसार तयार करण्यासाठी कित्येक दिवस घालावे लागतात. फुलविलेला संसार नाहिसा करण्यासाठी काहीच क्षण लागतात. प्रचंड अशा धो-धो पावसाने उदयास आलेल्या पुरामुळे संसाराची बेचिराख झालेली आहे. ही वाताहत पाहून प्रत्येकाचेच मन कारूण्याच्या झऱ्याला वाट करून देते. ग्रामीण जीवनात जनावराशिवाय पर्याय नाही. शेतकऱ्यांचा, कष्टकऱ्यांचा, जित्राबवर खूप जीव असतो, तसेच प्राण्यांना तळहाताच्या फोडाप्रमाणे जपतात. गायीचं स्थान प्रत्येक हिंदूवासीयांच्या मनात आदरांचं आहे. गाय म्हणजे कामधेनू आहे. गायीपासून ग्रामीण लोकांना अनेक फायदे मिळतात. गाय दूध देते आणि तिच्या पासून जन्माला आलेल गोर शेतीच्या कामासाठी उपयोगी येते. तिची विष्ठा शेतीला सेंद्रिय खत म्हणून उपयोगात आणली जाते. गाय बेदनामय प्रसुतीतून वासराला जन्म देते. तेच वासरु जर पुरात वाहून गेले, तर तिच्या मनाची अवस्था केविलवाणी होते. असा चिंतन विचार कवितेत मांडलेला आहे.

**निष्कर्ष:**

ग्रामीण कवितेची बोलीभाषा एक स्वतंत्र आणि जीवनरूपी अनुभवांचे परिचय करून देते. या कवितांमागील लेखकांनी ग्रामीण भाषेतील सामाजिक, सांस्कृतिक, आणि आर्थिक वायसायिक परिस्थित्यांचे छायाचित्र केले आहे. गावांच्या जीवनातील सौंदर्य, संघटना, आणि ग्रामीण भूतपूर्वक जीवनशैली हे सर्वांत महत्त्वाचे आशय आहे, असे कवितांतर्गत अभिव्यक्त केले जाते. ग्रामीण कवितेतील बोलीभाषांतर म्हणजेच ती कविता ज्यात गावाची भाषा आणि लोककला साकारात्मकता स्थानांतर केली आहे. या कवितांतर्गत गावांचे असलेले स्थानीक विशेषत्व, विविधता, आणि साने-गुरुजींच्या मार्गदर्शनाने निर्माण केलेले बोलीसंवेदनशील छायाचित्र वाचकांना अनुपम आनंदाची अनुभूती करू शकते. ग्रामीण कवितेत बोलीभाषांतर एक सर्वोत्कृष्ट रूपांतर आहे ज्याने गावाच्या सौंदर्याची भाषा साकारात्मकतेत व्यक्त केली आहे. या कवितेत जीवनदर्शनाचे विस्तार होते आणि ग्रामीण जीवनातील सर्व रंग, भावनांची उरळ, आणि संघटना अद्याप रंगांकिंब आनंदित करताना वाचकांना स्पष्ट होते. ग्रामीण कवितेचे हे विशेष आणि सांगीतिक प्रयोग वाचकांना भावनांची गंभीरता वापरते आणि ग्रामीण सांस्कृतिक धरोहरांची उपास्यता सुरक्षित करते. "मराठवाडी ग्रामीण कवितेतील बोलीभाषांतर आणि जीवनदर्शन" हे एक विचारात्मक आणि साहित्यिक चिंतन क्षेत्रातील महत्त्वाचे विषय आहे आणि त्यातील सगळे आशय वाचकांना अत्यंत रूचिकरपणे प्रस्तुत केले जाते.